


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.blogspot.com

● वर्ष २४ वे ● अंक २९७ ● मंगळवार दि. २५ ऑगस्ट २०२६ ● नांदेड ● पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी/२६२/२०२६-२०२८ ● पाने ४ ● मुल्य १ रु.

## आदिवासी वसतिगृह प्रवेशाची वयोमर्यादा शिथिल

### खा.राहुल गांधींच्या पत्राची दखल घेत मंत्री अशोक उईके यांची घोषणा



**मुंबई/प्रतिनिधी-** राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशासाठी लागू करण्यात आलेली वयोमर्यादेची अट शिथिल करण्याचा निर्णय मंगळवारी (२५ ऑगस्ट) घेण्यात आला. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी मुंबईत याबाबतची घोषणा केली.


राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशाचा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून चर्चेत होता. वयोमर्यादेमुळे अनेक विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वपक्षीय आदिवासी आमदार व खासदारांसोबत मुंबईत बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर सरकारने वयोमर्यादेची अट शिथिल करण्याचा निर्णय जाहीर केला. दरम्यान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही या राहुल गांधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले होते. आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यानंतर काही तासांतच सरकारकडून वयोमर्यादेबाबत निर्णय जाहीर करण्यात आल्याने या प्रश्नाला राजकीय रंगही आला आहे.सरकारच्या या निर्णयामुळे वयोमर्यादेच्या अटीमुळे अडचणीत आलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. शिक्षणासाठी ग्रामीण व दुर्गम भागातून शहरांमध्ये येणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे वयोमर्यादेची अट शिथिल करण्याच्या निर्णयाचे विद्यार्थी व पालकांकडून स्वागत होण्याची शक्यता आहे.राहुल गांधी यांच्या पत्रानंतर सरकारने तातडीने निर्णय घेतल्याने विरोधकांच्या मागणीचा सरकारवर परिणाम झाला का, याबाबत राजकीय चर्चेला सुरुवात झाली आहे. मात्र, सर्वपक्षीय आदिवासी लोकप्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

## अंगणवाडीत निकृष्ट आहार आढळल्यास तात्काळ बदलण्याचे निर्देश



**मुंबई/प्रतिनिधी-**राज्यातील अंगणवाड्यांमध्ये बालकांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत तक्रारी वाढत असताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी राज्यातील सर्व अंगणवाड्यांमधील आहाराची ४८ तासांत प्रत्यक्ष तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

मुख्यसेविका, पर्यवेक्षिका, बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा प्रशासनाने अंगणवाड्यांना भेट देऊन आहाराची गुणवत्ता, सुरक्षितता आणि स्थिती तपासावी. आहार निकृष्ट किंवा खराब आढळल्यास तो संबंधित पुरवठादाराकडून तात्काळ बदलून घेण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार आहे.पुणे जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका देवयानी पारधी यांनी निकृष्ट वाटाणा आणि भरड्याबाबत व्हिडिओद्वारे प्रश्न उपस्थित केला होता. या पार्श्वभूमीवर विभागाने आता आहाराच्या गुणवत्तेबाबत कठोर भूमिका घेतली आहे. तपासणीनंतरही तक्रार आढळल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असा इशारा तटकरे यांनी दिला आहे.




### एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत यासाठी आ.बोंढारकर यांचे महादेवाला साकडे...



**शिवसेना नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत तसेच शेतकरी व भाविकांना सुख-समृद्धी लाभो असे साकडे आ. आनंदराव पा. बोंढारकर यांनी कावड यात्रेनिमित्त आयोजित कार्यक्रमात उर्वशि मंदिर येथील महादेवाला घातले आहे.**

## जिल्ह्यात तीन दिवस प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील माहूर येथे दि. २६ ते २८ ऑगस्ट २०२६ दरम्यान निघणाऱ्या पोळा मिरवणुका तसेच पंचक्रोशी यात्रा आणि नारळी पौर्णिमेनिमित्त होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३६ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. माहूर येथे नारळी पौर्णिमेनिमित्त मोठ्या प्रमाणात पंचक्रोशी यात्रा भरणार आहे. **पान ४ वर**

## दोन एकरांची स्मशानभूमी आली २०० चौरस फुटांवर!

### गोकुंद्याच्या मृतांचीही जागेसाठी फरफट;स्मशानभूमीचा घोटाळा चर्चेत



**किनवट/प्रतिनिधी-**सत्तावीस हजाराच्या आसपास लोकवस्ती असलेल्या गोकुंदागावी केवळ एक स्मशानभूमी तीही तुटपुंज्या जागेत असल्यामुळे गोकुंदावाशियांची जाणीवपूर्वक क्रुरचेष्टा चालवली आहे. दोन एकर जमिनीवरची स्मशानभूमी २०० चौरस फुटांवर आली आहे. पैनगंगाकिनारी स्मशानभूमी असल्याने पुरसंरक्षण भिंतीसह सुशोभिकरण आणि विकास करणे अपेक्षित असले तरी, जायला धड रस्ता नाही. पावसाळ्यात तर मृतदेहासह अंतयात्रेतील लोकांना यातणा भोगाव्या लागताहेत. जिल्हाधिकारी, आमदार आणि ग्रामपंचायतीने तात्काळ दखल घेऊन जुन्या स्मशानभूमीचा विकास आणि वाढीव लोकसंख्येच्या तुलनेत नवीन स्मशानभूमी देण्याची मागणी संतप्त नागरिकांनी केली आहे.

किनवट ते भोकर जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर किनवट शहराला लागून तालुक्यातील सर्वात मोठी गोकुंदा ग्रामपंचायत आहे. याच राष्ट्रीय महामार्गाला लागूनच शासकीय आरटीआयच्या भिंतीला लागूनच पश्चिम बाजूने आणि महामार्गाच्या पूर्वेकडून शेत सर्वे नंबर १६ मध्ये पाच गुंठे मसनवटा असतांना देखील रुद्राक्ष ट्रेडर्स च्या सर्व नंबर ११४ व ११५ तील ले-आउटला मंजुरी देताना सौ.सविता मडावी व सौ.लक्ष्मीबाई कागणे या ग्रामपंचायत सदस्यांनी आक्षेप घेतल्यानंतर मोजणी केली. महामार्गाला लागून असल्याने घोटाळेबाजांनी फुकटची जमीन **पान ४ वर**

## पेपरफुटीच्या आरोपांवरून एमपीएससी विद्यार्थ्यांची राज ठाकरेंकडे धाव



**मुंबई/प्रतिनिधी-**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक भरती परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून परीक्षा रद्द करावी, तसेच फेरपरीक्षा घेण्यात यावी, या मागणीसाठी एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची शिवतीर्थ येथे भेट घेतली. विद्यार्थ्यांनी राज ठाकरे यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

औषध निरीक्षक भरती परीक्षेतील कथित घोटाळा आणि राज्यव्यापी पेपरफुटी प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी निवेदनातून केली आहे. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत भरती प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी आणि परीक्षा रद्द करून नव्याने फेरपरीक्षा घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाकडे २१, २३ आणि २४ जुलै २०२६ रोजी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. मात्र, या तक्रारींवर अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याने विद्यार्थ्यांनी राज ठाकरे यांची भेट घेऊन हा प्रश्न त्यांच्या माध्यमातून सरकारपर्यंत पोहोचविण्याची मागणी केली.या भेटीनंतर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी माध्यमांशी बोलताना विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर मनसे ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी राहणार असल्याचे सांगितले. पेपरफुटीच्या मूळ प्रश्नावर सरकारने गांभीर्याने भाष्य करून **पान ४ वर**



# रुग्णालयातच जीव धोक्यात!

अमरावतीच्या स्त्री रुग्णालयातील नवजात बालकांच्या अतिदक्षता केंद्रात पहाटे साडेतीनच्या सुमारास लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची घटना केवळ हृदय पिळवटून टाकणारी नाही, तर राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. ज्या रुग्णालयात नवजात बालकांचे प्राण वाचवण्यासाठी अतिदक्षता केंद्र उभारले जाते, त्याच ठिकाणी आग लागून निष्पाप बालकांचा जीव जाणे ही आरोग्य व्यवस्थेतील बेफिकिरीची परिसीमा म्हणावी लागेल.ही घटना केवळ दुर्दैवी अपघात म्हणून विसरून जाण्याची नाही. महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांमध्ये आगीच्या, ऑक्सिजनच्या कमतरतेच्या, औषधांच्या तुटवड्याच्या किंवा अन्य निष्काळजीपणाच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. मुंबई, नांदेड आणि राज्यातील अन्य जिल्ह्यांतील घटनांनी प्रशासकीय यंत्रणेला वारंवार इशारा दिला आहे. मात्र प्रत्येक दुर्घटनेनंतर चौकशी समिती, अहवाल, दोषींवर कारवाईचे आश्वासन आणि काही दिवसांची चर्चा एवढ्यावरच विषय संपतो. त्यानंतर पुन्हा परिस्थिती पूर्वपदावर येते. अमरावतीची घटना हा त्याच उदासीनतेचा आणखी एक धक्कादायक पुरावा ठरू नये, हीच अपेक्षा.सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व केवळ एवढेच नाही की तेथे गरीब आणि सर्वसामान्यांना उपचार मिळतात. ही व्यवस्था समाजाच्या विश्वासाचीही आधारशिला आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी मोठा खर्च येतो. अनेकदा रुग्णांच्या मनात अनावश्यक तपासण्या, महागडी औषधे किंवा गरजेपेक्षा अधिक उपचार सुचवले जात असल्याची शंका निर्माण होते. प्रत्येक खाजगी रुग्णालयाबाबत असा सार्वत्रिक निष्कर्ष काढता येणार नाही; परंतु उपचारांचा वाढता खर्च आणि या व्यवस्थेबद्दल निर्माण होणारा अविश्वास यामुळे सर्वसामान्य नागरिकांसाठी शासकीय रुग्णालय हा अधिक विश्वासार्ह आणि परवडणारा पर्याय ठरतो.म्हणूनच सार्वजनिक आरोग्य व्यवस्था कमकुवत होणे म्हणजे केवळ सरकारी यंत्रणेचे अपयश नव्हे; ते समाजातील मोठ्या वर्गाच्या आरोग्य सुरक्षेला धक्का देणे आहे. खासगी उपचार परवडत नाहीत म्हणून सामान्य माणूस शासकीय रुग्णालयात जातो. तेथे त्याला तुलनेने कमी खर्चात उपचार, आवश्यक सुविधा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सुरक्षिततेची हमी मिळेल, अशी त्याची अपेक्षा असते. ही अपेक्षा जर आगीसारख्या दुर्घटनांमुळे वारंवार भंग पावत असेल, तर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील विश्वासच डळमळीत होईल. रुग्णालय म्हणजे केवळ इमारत, खाटा आणि वैद्यकीय उपकरणे नव्हेत. तेथे दाखल होणारा प्रत्येक रुग्ण आपले जीवन आणि आपल्या कुटुंबीयांचा विश्वास त्या व्यवस्थेवर सोपवत असतो. विशेषतः नवजात बालकांच्या अतिदक्षता विभागात काही क्षणांचाही निष्काळजीपणा जीवघेणा ठरू शकतो. अशा विभागांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग, विद्युत व्यवस्था, अग्निशमन उपकरणे, प्रशिक्षित कर्मचारी आणि नियमित मॉक ड्रिल यांची काटेकोर तपासणी होणे अत्यावश्यक आहे. कागदावर सर्व व्यवस्था असल्याचे दाखवणे आणि प्रत्यक्षात त्या कार्यरत असणे यात मोठा फरक आहे. दुर्घटना घडल्यावर हा फरक जीवघेणा ठरतो. सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अशा घटनांमधून प्रशासन नेमके शिकते तरी काय? एखाद्या रुग्णालयात आग लागल्यानंतर राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांची अग्निसुरक्षा तपासली जाते का? तपासणी झाली असेल तर त्रुटी दूर झाल्या आहेत का? विद्युत यंत्रणांची नियमित तपासणी होते का? आपत्कालीन परिस्थितीत नवजात बालकांना सुरक्षितपणे हलविण्याची प्रशिक्षित व्यवस्था आहे का? रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना अशा परिस्थितीचे प्रशिक्षण दिले जाते का? या प्रश्नांची उत्तरे आता केवळ कागदोपत्री नकोत; ती प्रत्यक्ष कृतीतून दिसली पाहिजेत.आपल्या देशात आधुनिक आरोग्य सुविधा वाढल्या, तंत्रज्ञान आले आणि मोठमोठी रुग्णालये उभी राहिली. पूर्वी घरातच बाळंतपण करण्याची प्रथा होती. अनेकदा प्रशिक्षित वैद्यकीय मदत उपलब्ध नसल्याने माता आणि नवजात बालकांचे जीव धोक्यात येत. त्या पार्श्वभूमीवर रुग्णालयांचा पर्याय हा आरोग्य व्यवस्थेतील मोठा बदल होता. मात्र जर जीव वाचविण्यासाठी उभारलेल्या रुग्णालयातच जीव धोक्यात येऊ लागले, तर विकासाची चाके पुढे जाण्याऐवजी उलट दिशेने फिरत असल्याचेच म्हणावे लागेल.अमरावतीतील घटनेची निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी झाली पाहिजे. आग नेमकी कशामुळे लागली, सुरक्षा यंत्रणा कार्यरत होती का, आपत्कालीन प्रतिसादात त्रुटी राहिल्या का आणि जबाबदारी कोणाची होती, याचा स्पष्ट खुलासा जनतेसमोर झाला पाहिजे. दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे अशी घटना पुन्हा कुठल्याही रुग्णालयात घडू नये यासाठी राज्यव्यापी सुरक्षा आराखडा तातडीने राबवला पाहिजे.तीन कुटुंबांनी आपल्या नवजात बालकांना गमावले आहे. त्यांची ही हानी कोणत्याही भरपाईने भरून निघणार नाही. त्यांच्या दुःखासमोर प्रशासनाने केवळ संवेदना व्यक्त करून थांबणे पुरेसे नाही. या तीन निष्पाप जीवांच्या मृत्यूला अर्थ तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा त्यानंतर महाराष्ट्रातील प्रत्येक शासकीय रुग्णालय अधिक सुरक्षित केले जाईल. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था ही सामान्य माणसाची शेवटची आशा आहे. त्या आशेवरचा विश्वास जर कायम ठेवायचा असेल, तर रुग्णालयात उपचार मिळण्याबरोबरच सुरक्षितपणे घरी परतण्याची हमी देण्याची जबाबदारीही सरकारला घ्यावी लागेल. अन्यथा प्रश्न पुन्हा तोच उभा राहील, आरोग्याची काळजी घेण्यासाठी रुग्णांनी अखेर कुठे जावे?

# हॉटेलचे पदार्थ खावे की, नाही?

शहरात आणि ग्रामीण भागात हॉटेल, खानावळी, हातगाड्या, मिठाईची दुकाने, फळविक्री केंद्रे तसेच विविध खाद्यपदार्थांच्या दुकानांमध्ये अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता आणि भेसळीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. अन्न भेसळीच्या प्रकरणांमध्ये वारंवार धाडी पडतात, मोठ्या प्रमाणात पदार्थ जप्त केले जातात, काही ठिकाणी निकृष्ट किंवा मुदतबाह्य पदार्थ आढळतात; मात्र या कारवायांनंतर पुढे काय होते, हा प्रश्न सामान्य नागरिकांच्या मनात कायम आहे. काही दिवसांनी पुन्हा त्याच प्रकारची भेसळ सुरू होते. मग प्रशासनाची कारवाई नेमकी किती परिणामकारक आहे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.



माध्यमांकडून वेळोवेळी अन्न भेसळीच्या प्रकारांवर प्रकाश टाकला जातो. नागरिकांच्या तक्रारी प्रसिद्ध होतात. संबंधित विभागाला माहिती दिली जाते. तरीही अनेक ठिकाणी परिस्थितीत अपेक्षित बदल दिसून येत नाही. एखाद्या दुकानात भेसळयुक्त पदार्थ आढळल्यास केवळ पदार्थ जप्त करून किंवा दंड करून प्रश्न सुटणार आहे का? वारंवार नियमभंग करणाऱ्या व्यावसायिकांचे परवाने रद्द करण्याची तरतूद असेल, तर तिचा कठोरपणे वापर का केला जात नाही? एखाद्याला एकदा कारवाई झाली आणि काही दिवसांनी तो पुन्हा पूर्वीप्रमाणे व्यवसाय करू लागला, तर त्या कारवाईचा धाक तरी किती राहतो? आज सामान्य नागरिकांसमोर सर्वात मोठा प्रश्न आहे तो म्हणजे हॉटेलमध्ये मिळणारे अन्न सुरक्षित आहे की नाही? ग्राहकाला आपल्या ताटात आलेल्या पदार्थाची निर्मिती कधी झाली, तो किती काळ सुरक्षित आहे, त्यात कोणते घटक वापरले आहेत, पाणी कोणत्या दर्जाचे आहे, स्वयंपाकघर किती स्वच्छ आहे, याची माहिती मिळत नाही. अनेक दुकानांमध्ये मिठाई, फरसाण, केक, पेस्ट्री, चाट, पनीर, गुपचूप, बर्गर, पिझ्झा, विविध सॉस, मसाले आणि इतर पदार्थ विकले जातात. मात्र या पदार्थांच्या निर्मितीची तारीख आणि वापरण्याची अंतिम तारीख स्पष्टपणे नमूद केली जातेच असे नाही. हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.

औषधांच्या बाबतीत उत्पादनाची तारीख, बॅच क्रमांक आणि एक्सपायरी डेट स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक असते. औषध शरीरात जाते म्हणून त्याच्या गुणवत्तेकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले जाते. मग अन्नपदार्थ शरीरात थेट जात नाहीत का? अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षितता हीसुद्धा तितकीच महत्त्वाची आहे. एखादा पदार्थ किती दिवसांपूर्वी तयार केला आहे, तो कोणत्या तापमानात ठेवला आहे, त्यात कोणते घटक वापरले आहेत, याची माहिती ग्राहकाला मिळणे आवश्यक आहे. ग्राहकाला माहितीचा अधिकार असताना खाद्यपदार्थांच्या बाबतीत ही पारदर्शकता का दिसत नाही? हायवेवर तर पावलोपावली हॉटेल्स उभी राहिलेली दिसतात. प्रवाशांसाठी या हॉटेल्सची मोठी गरज आहे. मात्र त्यांना मिळणारे अन्न आणि पाणी सुरक्षित आहे का, स्वयंपाकघराची स्वच्छता कोण तपासते, खाद्यपदार्थांचे नमुने नियमित घेतले जातात का, याची माहिती सामान्य नागरिकांना मिळत नाही. एखाद्या हॉटेलला परवाना देताना ज्या अटी घातल्या जातात, त्या अटींचे पालन नंतरही होते का, याची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे.

केवळ परवाना देणे पुरेसे नाही; त्यानंतरची पाहणी अधिक महत्त्वाची आहे.पाण्याचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. नागरिकांच्या आरोग्याचा थेट संबंध पाण्याशी आहे. शहरातील अनेक भागांत पाणीपुरवठ्याच्या वेळा निश्चित नसतात. काही वेळा पाण्यात गाळ येतो, तर काही ठिकाणी पाण्याच्या गुणवत्तेबाबत नागरिक तक्रारी करतात. पाणी शुद्ध करण्यासाठी विविध उपाययोजना आणि साहित्यावर मोठा खर्च केला जातो. मग त्याचा प्रत्यक्ष परिणाम नागरिकांना का जाणवत नाही? पाणी शुद्धीकरणासाठी तुरटी किंवा इतर साहित्य किती प्रमाणात वापरले जाते, पाण्याची तपासणी किती वेळा होते, त्याचे अहवाल काय आहेत, याची माहिती सार्वजनिक झाली पाहिजे.नगरपालिकेने प्रत्येक भागासाठी पाणीपुरवठ्याची वेळ निश्चित करून ती वृत्तपत्रांमधून आणि अधिकृत माध्यमांतून जाहीर करावी. नागरिकांना 'या भागात या दिवशी आणि या वेळेत पाणीपुरवठा होईल' अशी स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे. शासनाच्या विविध योजनांच्या जाहिराती जशा प्रसिद्ध केल्या जातात, त्याचप्रमाणे नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबतही माहिती देणे आवश्यक आहे.

पाणी कधी येईल, किती वेळ येईल, पाण्याची गुणवत्ता कशी आहे, तक्रार कुठे करायची, याची माहिती नागरिकांना असली पाहिजे.स्वच्छतेचा प्रश्नही शहरात गंभीर आहे. रस्ते झाडणाऱ्या कर्मचाऱ्यांपासून ते स्वच्छता विभागातील अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाची जबाबदारी निश्चित असली पाहिजे. रस्त्यावर झाडू मारताना केवळ काम उरकण्याची मानसिकता नको. हातात मोबाईल घेऊन किंवा घाईघाईने रस्ता साफ केल्यास कचरा पूर्णपणे दूर होणार नाही. स्वच्छता ही केवळ कागदावरील नोंद नसून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित व्यवस्था आहे.एखाद्या भागात दोन–दोन महिने केबलच्या तारा रस्त्यावर लोंबकळत असतील, फुटपाथवर पडलेल्या असतील किंवा वाहतुकीला अडथळा निर्माण करत असतील, तर त्याची जबाबदारी कोणाची? संबंधित केबल कंपनी कोणती, मालक कोण, परवानगी आहे का, याची तपासणी कोण करणार? आनंदनगरसारख्या भागात रस्त्यावर पडलेल्या किंवा लोंबकळणाऱ्या तारांकडे दुर्लक्ष होत असेल, तर भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? नागरिकांनी वारंवार तक्रारी कराव्यात आणि त्यानंतरही प्रश्न सुटत नसेल, तर प्रशासनावरील विश्वास कमी होणे स्वाभाविक आहे.

शहरातील फळविक्रीचाही प्रश्न गंभीर आहे. फळे विकणाऱ्या हातगाड्या आणि दुकानांची संख्या मोठी आहे. नागरिकांना कोणते फळ ताजे आहे, कोणते खराब आहे, फळांवर रासायनिक प्रक्रिया केली आहे का, त्यांची साठवणूक योग्य पद्धतीने झाली आहे का, याची माहिती मिळत नाही. अनेकदा फळे दिवसभर उन्हात ठेवली जातात. धूळ, धूर आणि अस्वच्छ वातावरणात त्यांची विक्री होते. ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने यावर नियमित नियंत्रण असणे गरजेचे आहे.हातगाडीवर रोज हजारो रुपयांची उलाढाल करणाऱ्या विक्रेत्यांची नोंद आहे का? त्यांच्याकडे व्यवसायाचा परवाना आहे का? अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन केले जाते का? त्यांची नियमित तपासणी होते का? करप्रणालीच्या दृष्टीने त्यांची नोंदणी झाली आहे का? हे प्रश्न उपस्थित करणे म्हणजे छोट्या व्यावसायिकांना त्रास देणे नव्हे. उलट, नियम पाळणाऱ्या आणि प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांचेही संरक्षण करणे होय. कोचिंग क्लासेसची परिस्थितीही वेगळी नाही. ग्रामीण भागातील अनेक शाळा विद्यार्थी संख्येअभावी ओस पडत आहेत. दुसरीकडे शहरांमध्ये शेकडो–हजारो विद्यार्थी कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षण घेताना दिसतात. काही संस्था विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातून शहरात आणतात, त्यांच्या राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था करतात आणि उत्तीर्ण होण्याची हमी देतात. जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक व्यवसाय सुरू असेल, तर त्याची अधिकृत नोंदणी आहे का? आवश्यक परवानग्या आहेत का? अग्निसुरक्षा, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची व्यवस्था, वसतिगृहांची स्थिती, भोजनाची गुणवत्ता आणि शुल्क याबाबत नियम आहेत का?

कोचिंग क्लासेस चालवायचे असतील तर त्यांना अधिकृत संस्थेचा दर्जा देऊन स्पष्ट नियमांच्या चौकटीत आणले पाहिजे. 'आम्ही मोठे आहोत', 'आम्ही एवढे विद्यार्थी पास केले' किंवा 'आमच्या संस्थेचा निकाल एवढा आहे' एवढ्यावर प्रशासनाने समाधानी राहू नये. मोठी विद्यार्थीसंख्या म्हणजे मोठी जबाबदारी. हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य ज्या संस्थांच्या हातात आहे, त्या संस्थांवर अधिक कठोर नियंत्रण असले पाहिजे.मद्यविक्रीचा प्रश्न तर सामाजिकदृष्ट्या अधिक गंभीर आहे. शहरातील अनेक वस्त्यांमध्ये आणि विविध भागांत सहजपणे मद्य उपलब्ध होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जातात. तरुण पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या विळख्यात अडकत आहे. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. मद्यपान करणाऱ्या व्यक्तीबरोबरच त्याच्या पत्नीला, मुलांना आणि संपूर्ण कुटुंबाला त्याची किंमत मोजावी लागते.महिलांसाठी विविध आर्थिक योजना जाहीर केल्या जातात. त्यांना आर्थिक मदत मिळते; परंतु घरातील पुरुषाने व्यसनाधीन होऊन त्या पैशाचा गैरवापर केला, तर त्या मदतीचा उद्देशच काय उरतो? एका हाताने मदत द्यायची आणि दुसऱ्या बाजूला व्यसन सहज उपलब्ध ठेवायचे, ही विसंगती दूर झाली पाहिजे. मद्यविक्रीच्या परवान्यांची काटेकोर तपासणी, नियमांचे पालन आणि बेकायदा विक्रीवर कठोर कारवाई आवश्यक आहे.

शासकीय योजनांची जाहिरात मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र योजना जाहीर करण्यापेक्षा तिचा लाभ खरोखर कोणाला मिळतो, हे तपासणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येक घरापर्यंत पोहोचून नागरिकांना नेमक्या कोणत्या समस्या आहेत, हे जाणून घेण्याची गरज आहे. वृद्ध नागरिकांना वैद्यकीय सेवा मिळते का? बसस्थानकांवरील सवलती किंवा इतर सुविधा त्यांना सहज उपलब्ध आहेत का? सरकारी कार्यालयात त्यांची कामे वेळेत होतात का? अशा प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने शोधली पाहिजेत. नवीन पिढीतील लोकप्रतिनिधींकडून नागरिकांना मोठ्या अपेक्षा आहेत. त्यांना उत्साहाने निवडून दिले जाते. 'आता काहीतरी बदल होईल', अशी आशा नागरिकांच्या मनात असते. परंतु केवळ सत्कार समारंभ, उद्घाटने आणि राजकीय कार्यक्रमांमध्ये वेळ घालवण्यापेक्षा प्रत्यक्ष लोकांच्या प्रश्नांकडे लक्ष देणे अधिक गरजेचे आहे. लोकप्रतिनिधींच्या आजूबाजूला असणाऱ्या कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनीही त्यांना वस्तुस्थिती सांगितली पाहिजे. फक्त कौतुक करणारी मंडळी एखाद्या नेत्याला वास्तवापासून दूर नेत असतील, तर त्याचा फटका शेवटी जनतेलाच बसतो. प्रशासनात अधिकारी आणि कर्मचारी आहेत. प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र यंत्रणा आहे. अन्न व औषध प्रशासन, नगरपालिका, आरोग्य विभाग, स्वच्छता विभाग, महसूल विभाग, उत्पादन शुल्क विभाग, शिक्षण विभाग अशा अनेक यंत्रणा कार्यरत आहेत. मग नागरिकांना वारंवार त्याच तक्रारी का कराव्या लागतात? कारवाई करणारी यंत्रणा अस्तित्वात असूनही तिचा परिणाम जमिनीवर दिसत नसेल, तर त्याची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे.

अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येक तक्रार पोहोचणेही महत्त्वाचे आहे. एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याला सर्व वस्त्यांमध्ये काय घडते, हे प्रत्यक्ष माहीत असेलच असे नाही. त्यामुळे तक्रार नोंदविण्याची व्यवस्था सुलभ असली पाहिजे. नागरिकांनी दिलेल्या तक्रारींची नोंद, तपासणी आणि त्यावरील कारवाईची माहिती सार्वजनिक केली तर प्रशासनातील पारदर्शकता वाढेल. लोकशाहीमध्ये माध्यमांचीही महत्त्वाची भूमिका आहे. परंतु जाहिराती आणि बातम्या यांच्यातील संबंधामुळे जनतेच्या प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचे काम दुर्बल होऊ नये. एखाद्या दुकानाची किंवा हॉटेलची जाहिरात मिळते म्हणून त्याच ठिकाणच्या गैरप्रकाराकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. माध्यमांनी लोकांच्या आरोग्याशी आणि सार्वजनिक हिताशी संबंधित प्रश्न निर्भीडपणे मांडले पाहिजेत. जाहिरातदार असो किंवा सामान्य नागरिक–कायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत.आज नागरिकांच्या मनात एकच प्रश्न आहे–आपण नेमके कोणावर विश्वास ठेवायचा? हॉटेलमधील पदार्थ सुरक्षित आहेत का? पाणी शुद्ध आहे का? मिठाई ताजी आहे का? फळे सुरक्षित आहेत का? हातगाडीवरील पदार्थ स्वच्छ आहेत का? कोचिंग क्लास कायदेशीर आहे का? रस्त्यावर पडलेल्या तारांची जबाबदारी कोणाची? दारूची बेकायदा विक्री कुठे होते? स्वच्छता नियमित होते का? या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

कारवाई म्हणजे केवळ धाड टाकणे नव्हे. कारवाई म्हणजे दोषी आढळल्यास कायद्यानुसार कठोर आणि सातत्यपूर्ण निर्णय घेणे. भेसळ करणाऱ्यांवर दंड, परवाना निलंबित करणे किंवा रद्द करणे, आवश्यक असल्यास गुन्हा दाखल करणे आणि पुन्हा तोच व्यवसाय नियमबाह्य पद्धतीने सुरू होऊ नये याची खात्री करणे, ही खरी कारवाई आहे.अन्न भेसळ हा केवळ व्यापाऱ्याचा प्रश्न नाही; तो संपूर्ण समाजाच्या आरोग्याचा प्रश्न आहे. निकृष्ट अन्नामुळे आजारी पडणाऱ्या नागरिकांच्या उपचाराचा खर्च कोण करणार? लहान मुलांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम झाला तर त्याची जबाबदारी कोणाची? तरुण पिढी व्यसनाधीन झाली तर त्याचे सामाजिक परिणाम कोण भोगणार? पाणी दूषित झाले तर त्याचा फटका गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना सर्वाधिक बसतो.म्हणूनच प्रशासनाने आता केवळ कागदावरील कारवाई न करता प्रत्यक्ष परिणाम दिसेल अशी मोहीम हाती घ्यावी. हॉटेल्स, खानावळी, मिठाई दुकाने, हातगाड्या, फळविक्रेते, पाणी विक्रेते, कोचिंग क्लासेस, हायवेवरील व्यावसायिक आस्थापना आणि मद्यविक्री केंद्रांची नियमित तपासणी झाली पाहिजे. प्रत्येक नियमभंगाची नोंद झाली पाहिजे. दोषींवर कारवाई झाली पाहिजे आणि कारवाईची माहिती नागरिकांनाही मिळाली पाहिजे. नागरिकांनीही आपल्या जबाबदारीपासून पळता कामा नये. संशयास्पद अन्नपदार्थ आढळल्यास तक्रार करावी. पाणी दूषित असल्यास प्रशासनाला कळवावे. रस्त्यावर धोकादायक तार दिसल्यास संबंधित विभागाकडे तक्रार करावी. बेकायदा मद्यविक्री किंवा इतर गैरप्रकार आढळल्यास त्याची माहिती द्यावी. प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे आणि उत्तर देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

आज गरज आहे ती केवळ आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीची. नागरिकांनी मोठ्या अपेक्षेने लोकप्रतिनिधींना निवडून दिले आहे. त्या अपेक्षांचा विश्वसघात होऊ नये. लोकप्रतिनिधींनी जनतेमध्ये जाऊन समस्या समजून घ्याव्यात, अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे आणि प्रशासनाला कामाला लावावे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही आपल्या अधिनस्त यंत्रणेच्या कामकाजाची नियमित तपासणी करावी.अन्न व औषध प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित जबाबदार अधिकारी या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देतील, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. मात्र त्यासाठी त्यांच्यापर्यंत वस्तुस्थिती पोहोचणे आवश्यक आहे. पावलोपावली सुरू असलेली भेसळ, अस्वच्छता, अनियमितता आणि नियमभंग याकडे आता दुर्लक्ष करता येणार नाही.नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणाचाही आशीर्वाद मिळता कामा नये. प्रशासनाने कोणालाही वाचवण्यापेक्षा कायद्याचे राज्य प्रस्थापित केले पाहिजे.शहर स्वच्छ, पाणी शुद्ध, अन्न सुरक्षित, शिक्षण व्यवस्थित, रस्ते सुरक्षित आणि समाज व्यसनमुक्त असणे ही जनतेची अपेक्षा अवास्तव नाही. ही नागरिकांची मूलभूत अपेक्षा आहे. त्यासाठी सरकारी यंत्रणा आहे, अधिकारी आहेत, लोकप्रतिनिधी आहेत आणि कायदे आहेत. गरज आहे ती फक्त या सर्वांनी आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याची. नागरिकांना आता केवळ 'सगळे ठीक आहे' असे सांगण्याची गरज नाही. सगळे ठीक करून दाखवण्याची गरज आहे. कारण प्रश्न एका हॉटेलच्या अन्नाचा नाही, एका भागातील पाण्याचा नाही, एका रस्त्यावरील तारांचा नाही किंवा एका दुकानातील मिठाईचा नाही. प्रश्न आहे तो आपल्या शहराच्या आरोग्याचा, सुरक्षिततेचा आणि प्रशासनावरील विश्वासाचा. हा विश्वास टिकवायचा असेल तर आता प्रत्येक विभागाने जागे होणे अत्यावश्यक आहे.

**–दत्तोपंत डहाळे.नांदेड.**

---

सर्वोच्च न्यायालयात शिवसेनेने चार वर्षां पूर्वी दाखल केलेल्या याचीकेवरची अंतिम सुनावणी सुरू आहे.या सुनावणीत शिवसेना उबाठा गटाच्या वतीने जेष्ठ विधिज्ञ कपील सिब्बल कोर्टात युक्तिवाद करत आहेत.तो प्रसार माध्यमे व सोशल मीडियावर दाखवला जात आहे तो पाहून ऐकुण सारा देश भारावून गेला.

खरे तर न्याय–व्यवस्थेबदल माझ्याच नव्हे तर अनेकांच्या मनात जो संशय निर्माण झाला होता तो कमी झाला असं मला निःसंशय वाटते त्याला कपील सिब्बल यांनी केलेला न्यायालयात युक्तिवाद व त्यावर सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या टिप्पण्या कारणीभूत आहेत.! यामुळे एकुणच सर्व सामान्य माणसाच्या मनात जो न्यायपालीकेच्या बाबतीत संशय निर्माण झाला होता तो दूर होण्यास काही प्रमाणात का होईना मदत झाली अस माझं प्रांजळ मत आहे.!

सर्वोच्च न्यायालयात या केसचा निकाल काहीही लागो पण सिब्बल यांनी केलेला बिनतोड युक्तीवाद.! शिवसेना मुळपक्ष, शिवसेनेची घटना, विधिमंडळ पक्षातील फुट,निवडणूक आयोगाने घेतलेली भूमिका यावर संविधानातील तरतूदीचे कसे उल्लंघन केले गेले हे सप्रमाण न्यायालयात दाखवून दिले. ते पाहता पुन्हा एकदा न्यायालया बाबत वीश्वासहर्ता वाढीस लागली.व

## चिंतन...

गेल्या दशकभरापासून लोकशाहीचे होत असलेले वस्त्र हरण थांबेल असा आशेचा किरण दीसु लागला आहे,तशी चर्चा ही सामान्य माणसात ऐकायला मिळते.

या केसच्या निकालाचा भविष्यात आपल्या लोकशाहीवर,संविधानावर तसेच प्रादेशिक पक्षावर मोठा परीणाम होणार आहे.हा निकाल मला तरी नक्कीच ऐतिहासिक ठरेल असे वाटते.एवढेच नव्हे तर जगातील सर्वात मोठी असलेली आपली लोकशाही ज्या संविधानावर टिकून आहे ते संविधान विश्वात श्रेष्ठ आहे हे सिद्ध होईल..! जर या केसचा निकाल संवीधानतिल तरतूदी प्रमाणे लागला तरच न्यायपालेकेवरील जनतेचा कमी होत आसलेला विश्वास पुन्हा वाढायला मदत होईल यात शंका नाही. सविंधानाच्या चोकटीत राहुन तुम्ही जो युक्तीवाद केला त्या बद्दल मराठी माणसा सोबतच संविंधानावर व आपल्या लोकशाहीवर प्रेम करणारा प्रत्येक जण कृतज्ञ राहील. ग्रेट कपीलजी सिब्बल...!

तुम्हाला सलाम..!!

**सुनील खंडाळिकर**
**९०११८०४८२८**

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
फोन (०२४६२) २३९१११, **फॅक्स नं.** ०२४६२-२३९१११
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# विधवा महिलेकडे शरिर सुखाची मागणी करणाऱ्याविरुद्ध दोन दिवसानंतर गुन्हा दाखल

## गोकुंदा विश्रामगृहातील सुरक्षा व्यवस्थेचे वाभाडे

**किनवट/प्रतिनिधी**–गोकुंदा येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या विश्रामगृहातील स्वयंपाकगृहात काम करीत असताना वासनांध झालेल्या बालाजी केंद्रे याने अश्लील चाळे व भाष्य केल्या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात दखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. सलग दोन दिवस विश्रामगृहात येऊन अत्याचार करण्याचे धाडस करणाऱ्या नराधमाला रोखण्यासाठी संबंधित जबाबदार यंत्रणेतील एकही कर्मचारी अथवा अधिकारी उपस्थित राहू नये ही गंभीर बाब आहे. विश्रामगृहात काम करणाऱ्या असह्य महिलेच्या सुरक्षेची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन यंत्रणेलाही जबाबदार धरुन कारवाई झाली पाहिजे कारण भविष्यात अशी लापरवाही होता कामानये, अशा संतापजनक प्रतिक्रिया उमटायला सुरूवात झाली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्याकडे चौकशीची बागदोर असल्याने त्यांच्या तपासातून काय काय समोर येणार ते पहायला मिळणार आहे.

दि.२० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास सदर महिला विश्रामगृहातील स्वयंपाकगृहात काम करीत असताना आरोपी बालाजी केंद्रे हा तेथे आला. त्याने महिलेकडे पाहून अश्लील चाळे आणि वक्तव्य करीत असह्य झालेल्या महिलेकडून या वासनांधाने अंगसंगाची मागणी केल्याचा आरोप सदर तक्रारीत नमूद केला आहे.तदोपरांत तो तेवढ्यावरच थांबला नाही तर त्याची मस्ती वाढली आणि बेडरपणे पुन्हा २१ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास पुन्हा स्वयंपाकगृहात जावून त्या महिलेचा हात धरुन अंगसंगाची मागणी केल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. सलग दोन दिवस या असह्य एकट्या महिलेला गाठून पाठलाग करीत असतांना तिच्या सुरक्षेच्या दृष्टीने किमान दुसऱ्या दिवशी तरी तिच्या मदतीला प्रशासनातील एकही कर्मचारी वा अधिकारी कामी आला नसल्याने या घटनेला कोणाची जबाबदारी निश्चित करणार ? असा सवाल निर्माण होतोय. त्या महिलेच्या तक्रारीवरून आरोपी केंद्रे विरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम ७४, ७५ (२) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ मधील अन्वये २२ ऑगस्ट रोजी गुन्ह्याची नोंद करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.या प्रकरणाचा तपासच उपविभागीय पोलीस अधिकारी कदम यांच्या हाती आहे. त्यांनी पोलीस उपनिरीक्षक लेनगुळे यांना सोबत घेऊन घटनास्थळी भेट देऊन तपासाची चक्रे गतीमान केल्याचे समजते. विश्रामगृह लोकवर्दळीने नेहमीच गजबजलेले असते. शिवाय विश्रामगृहाची देखभाल करण्यासाठी नेमलेले कर्मचारी, ज्यांच्याकडे विश्रामगृहाच्या कामकाजाची सूत्रे असतील तो अभियंता अशा अनेकांच्या उपस्थितीत असा प्रसंग ओढवावा हे महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नक्कीच चिंता वाढविणारा प्रकार होय. आरोपी केंद्रे हा कामाशिवाय विश्रामगृहावर दररोज जात होता की, या दोन दिवसातच आला होता ? कामाशिवाय थेट स्वयंपाकगृहात जाताना त्याची कोणी विचारपूस केली होती का ? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. आता पोलीस तपास हा सर्व बाजूंनी होतोय का यावरही खुप काही निर्भर असणार आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी कदम हे कर्तव्यदक्ष असल्याने या घटनेच्या सर्वांचाच छडा लावल्याशिवाय सोडणार नाहीत, असा अनेकांनी विश्वास व्यक्त केलाय.

# उस्माननगर येथील हातपंप पावसाळ्यात सुध्दा बंद;ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष



**उस्माननगर/प्रतिनिधी**–कंधार तालुक्यातील पाणीटंचाईचे गाव म्हणून कोणते? जर विचारले तर सरळ उत्तर मिळते, उस्माननगर येथील हातपंप अर्धा पावसाळा संपत आला तरी वेळो-वेळी ग्रामपंचायत अधिकारी यांना निर्देशनास आणून दिले तरी लक्ष द्यायला वेळच मिळत नसल्याने त्या परिसरातील नागरिकांना इतरत्र भटकंती करावी लागत असून काहीजण खाजगी टँकरचे विकत घेऊन वेळ काढावी लागत आहे.

उस्माननगर येथील लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे सांस्कृतीक सभागृह परिसरातील हातपंपाचे पाईप गंजून खराब झाले आहेत हातपंपाची दुरूस्ती केली तर या भागातील नागरिकांची सोय होणार आहे. मागील चाळीस वर्षांपासून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. प्रत्येक निवडणुकीत लोकप्रतिनिधी मतदान मिळविण्यासाठी निवडणुकीच्या धामधुमीत तुमच्या गावची पाण्याची समस्या मिटवून टाकु, मला निवडून द्या असे आश्वासन देऊन मते घेतात, पण प्रश्न काही कायमचा सुटला नाही. स्थानिक स्वराज्याच्या निवडणुका जाहीर होणार या भितीने या परिसरातील लोकप्रतिनीधी गल्लो-गल्लीतून बैठका,भेटी गाडीवर भर दिला होता, पण निवडणुका लांबणीवर गेल्याने कोणताच लोकप्रतिनीधी गावातील समस्या बघण्यासाठी आला नाही, किंवा फिरकला नाही. उस्माननगर येथे कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजना अनेक वर्षांपासून कागदपत्री चालू आहे. पण प्रत्येक्षात ही योजना बंद असल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. येथील नागरिकांची भटकंती थांबविण्यासाठी तात्काळ पाणीपुरवठा योजना चालू करावी अशी मागणी होत आहे.प्रशासन आणि लोकप्रतिनिधी मध्ये ताळमेळ लागत नसल्याने व लोकप्रतिनिधींचा वचक नसल्याने प्रशासकीय आधिकारी मन लावून काम करत नसल्याचे चित्र उस्माननगर परिसरात दिसून येते.

# एसआयआर मोहिमेत माहूरचा 'परफेक्ट स्कोअर!

**माहूर/प्रतिनिधी**–राज्यात राबविण्यात आलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेअंतर्गत घरोघरी जाऊन मतदारांकडून गणना प्रपत्र भरून घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानंतर आता मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना तसेच मतदारांकडून प्राप्त होणारे दावे व हरकती निकाली काढण्याच्या प्रक्रियेला निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली आहे. या पार्श्वभूमीवर माहूर तालुक्यात सहा. जिल्हाधिकारी बी.सरवनन व तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली बीएलओंनी १७ ऑगस्टपर्यंत राबविलेल्या एसआयआर मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

माहूर तालुक्यात एकूण ८० हजार ९७६ मतदार असून सर्व मतदारांना गणना प्रपत्रांचे वितरण करण्यात आले. विशेष म्हणजे १०० टक्के म्हणजेच ८० हजार ९७६ प्रपत्रांचे वितरण पूर्ण झाले आहे. त्यापैकी ७५ हजार ३८६ मतदारांचे ईएफ डिजिटायझेशन पूर्ण झाले असून या सर्व मतदारांची बीएलओमार्फत पडताळणीही करण्यात आली आहे. त्यामुळे या व्यापक मोहिमेची अंमलबजावणी करताना तालुक्यातील बीएलओंच्या कामाची कार्यक्षमता अधोरेखित झाली आहे.एसआयआर प्रक्रियेदरम्यान तालुक्यात २ हजार ५७२ मॅपिंग न झालेली प्रकरणे, १ हजार १९३ मयत मतदार, २ हजार ७४९ कायम स्थलांतरित मतदार, १ हजार ३६० दुबार नोंदी आणि २८७ अनुपस्थित मतदार आढळून आले. इतर कारणातील एका प्रकरणासह तालुक्यात एकूण ५ हजार ५९० यूईएफ प्रकरणांची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे प्रलंबित अर्जांची संख्या शून्य असल्याने प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यात प्रशासनाला यश आले आहे.माहूर शहरातील बूथ क्रमांक २४ ते ३३ अशा एकूण १० मतदान केंद्रांवर ९ हजार ७१६ मतदार आहेत. यापैकी ८ हजार ४८९ मतदारांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असून त्यांची बीएलओमार्फत पडताळणी करण्यात आली आहे. शहरातील एकूण १ हजार २२७ यूईएफ प्रकरणे आढळून आली आहेत.यामध्ये ४०४ मतदारांची पडताळणी न झालेली प्रकरणे, २१५ मयत मतदार, ३८५ कायम स्थलांतरित मतदार, ४२७ दुबार नोंदी आणि २०० अनुपस्थित मतदारांचा समावेश आहे. इतर कारणातील एकही प्रकरण आढळून आलेले नाही. एसआयआर सारख्या व्यापक आणि महत्त्वपूर्ण प्रक्रियेत बीएलओंनी प्रत्यक्ष घरोघरी जाऊन मतदारांची माहिती संकलित करून त्याची पडताळणी करण्याचे काम केले. तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर शहरासह तालुक्यातील बीएलओंनी केलेल्या या कामगिरीचे कौतुक होत आहे. मतदारयादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याच्या दृष्टीने माहूर तालुक्यातील एसआयआर प्रक्रिया महत्त्वपूर्ण ठरली आहे.एसआयआर प्रक्रियेनंतर प्रारूप मतदारयादी २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर मतदारांना दावे व हरकती नोंदविण्यासाठी महिनाभराची मुदत दिली जाणार आहे. यादीत नाव नसलेल्या पात्र मतदारांना तसेच १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना फॉर्म क्रमांक ६ भरून मतदारयादीत नाव नोंदविता येणार आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी प्रारूप मतदारयादी तपासून आपले नाव असल्याची खात्री करण्याचे आवाहन तहसीलदार अभिजित जगताप यांनी केले आहे.




**मंगळसुत्र चोरी व घर फोडीच्या गुन्ह्यातील आरोपी मोहमद अफताब अब्दुल खदीर यास स्थानिक गुन्हा अन्वेशन विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली फौजदार मिलींद सोनकांबळे व पोलिस कर्मचाऱ्यांनी कौठा भागात अटक केली आहे.**

# जमावबंदी,शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड/प्रतिनिधी**– नांदेड जिल्ह्यात २५ ऑगस्टच्या सकाळी ६ वाजेपासून ते ८ सप्टेंबर २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २५ ऑगस्टच्या सकाळी ६ वाजेपासून ते ८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

# उपजिल्हा रुग्णालयातील सिटीस्कॅन सेवेचे रिपोर्टिंग बंद

**मुखेड/प्रतिनिधी**–शहरातील उपजिल्हा रुग्णालयाचा मनमानी आणि गलथान कारभारामुळे सर्वसामान्य रुग्णांचे हाल सुरूच आहेत. कधी एक्स-रे मशिन बंद, कधी दिव्यांगांच्या सेवेसाठी कर्मचाऱ्यांची वानवा, तर आता थेट सिटीस्कॅन मशीनचे पुण्याहून मिळणारे रिपोर्टिंग बंद झाल्याने तालुक्यातील नागरिकांना मोठा फटका बसत आहे. रिपोर्टिंगचे टेंडर संपल्याचे कारण पुढे करत आरोग्य विभागाने रुग्णांच्या आरोग्याशी चालवलेला खेळ आता चव्हाट्यावर आला आहे.

या रुग्णालयात ग्रामीण भागातून दररोज सुमारे ३०० ते ४०० रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र, येथे वैद्यकीय सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने बहुतांश रुग्णांना तात्काळ इतरत्र रेफर केले जात आहे. सिटीस्कॅन काढल्यानंतर त्याचे अहवाल (रिपोर्ट्स) वेळेत मिळावेत यासाठी पुणे येथील एजन्सीचे टेंडर संपुष्टात आल्याने हे संकट ओढवले आहे. यामुळे रुग्णांना खासगी निदान केंद्रांवर हजारो रुपये मोजावे लागत असून आर्थिक भुर्दंडासोबतच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी रुग्णालयाच्या ढिसाळ कारभाराविरोधात सातत्याने आवाज उठवला आहे. मात्र, आरोग्य प्रशासन दोषी कर्मचाऱ्यांना पाठीशी घालण्यातच धन्यता मानत असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे. आरोग्य विभागाच्या या अनास्थेमुळे गरीब रुग्णांचा जीव धोक्यात आला आहे. तात्काळ सिटीस्कॅन रिपोर्टिंगसाठी तज्ज्ञांची नियुक्ती करावी किंवा जुन्याच पद्धतीने टेंडर प्रक्रिया राबवून सेवा पूर्ववत करावी, अशी मागणी नागरिक व विविध सामाजिक संघटनांकडून होत आहे.

# ईद-ए-मिलादुन्नबी मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरातील वाहतूक मार्गात बदल

**नांदेड/प्रतिनिधी**– ईद-ए-मिलादुन्नबी अनुषंगाने नांदेड शहरात दि.२६ ऑगस्ट २०२६ रोजी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित राहण्याची शक्यता असल्याने शांतता व सुव्यवस्था तसेच वाहतूक सुरळीत राहण्यासाठी नांदेड शहरातील काही मार्गांवरील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

प्रभारी पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत वाहतुकीसंदर्भात अधिसूचना जारी केली आहे.वाहतुकीसाठी बंद असलेले मार्ग बर्की चौक ते जुना मोंढा या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद राहील.जुना मोंढा-देना बँक-महावीर चौक-गांधी पुतळा-शिवाजी महाराज पुतळा-वजीराबाद चौक-कलामंदिर-शिवाजीनगर ते आयटीआय चौक-श्रीनगर-वर्कशॉप कॉर्नर या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद राहील. सिडको-हडकोकडून कोठा नाका मार्गे नवीन पुलावरून जुना मोंढ्याकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहील.रविनगर-जुना कोठा गोवर्धनघाट पुलावरून वजीराबाद चौक मार्गे वर्कशॉपकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहील. वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग:बर्की चौकाकडून जुना मोंढ्याकडे जाणारी वाहतूक इतवारा बाजार-डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय-भंगार लाईन-गिट्टी क्रेशर चौक-बाफना टी पॉईंट रोडने जाण्यासाठी वापरता येईल.जुना मोंढा ते वर्कशॉप मार्गावरील वाहतूक अबचलनगर-यात्री निवास-अण्णाभाऊ साठे चौक-महादेव दाल मिल-रोड नं. २६ ने ये-जा करतील किंवा नाईक चौक-टिळकनगर चौक-पिरबु-हान मार्गे चैतन्य नगरकडे वळविण्यात येईल.

वजीराबाद चौकाकडून श्रीनगरकडे जाणारी वाहतूक वजीराबाद चौक-तिरंगा चौक-पोलीस मुख्यालय कॉर्नर-लालवाडी अंडरब्रिज-शिवाजीनगर (पिवळी गिरणी) ते गणेशनगर वाय पॉईंट मार्गे वळविण्यात येईल.रविनगर-जुना कोठा-गोवर्धनघाट पुलावरून नांदेड शहरातून वर्कशॉपकडे जाणारी वाहतूक पोलीस मुख्यालय कॉर्नर-लालवाडी अंडरब्रिज-शिवाजीनगर (पिवळी गिरणी) ते गणेशनगर वाय पॉईंट मार्गे वळविण्यात येईल.जुना मोंढ्याकडून सिडको/हडकोकडे जाणारी वाहतूक भगतसिंग रोड-कविता हॉटेल-बाफना-देगलूर नाका-जुना पूल या मार्गाचा वापर करू शकेल.नागरिकांनी दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत वाहतूक व्यवस्थेतील या बदलांची नोंद घेऊन पर्यायी मार्गांचा वापर करावा, तसेच पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन नांदेड पोलिस प्रशासनाने केले आहे.



## जाहीर प्रगटन

दि. २४/०८/२०२६

श्री सयद अजीम रा.नांदेड स्वामी रामानंद तिर्थ चतुर्थ श्रेणी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. म्हाळजा ता.नांदेड जि.नांदेड सर्व्हे नं.३/४ मधील प्लॉट क्रं.१२,१३,१४,१५,१६,१७, २०, २१, २२, हे प्लॉट खरेदी केले आहे. संस्थेमार्फत कागदपत्रे मला देण्यात आली. मी येथून २४/०८/२०२६ नंतर १५ दिवसांने सदरील प्लॉटांचा ताबा घेणार आहे. सदरील प्लॉट बाबत कोणाला काही तक्रार असल्यास १५ दिवसाच्या आत सदरील तक्रार माझ्याकडे लेखी स्वरुपात नोंदवावे, कोणाची तक्रार प्राप्त न झाल्यास मी सयद अजीम दि.०८/०९/२०२६ ला सदरील प्लॉटांचा ताबा घेवून बांधकाम चालू करणार आहे.

स्वा/–
सयद अजीम
मो. ९८२३१३२०९५,

स्वा/–
अकबर चाऊस
मो.९६५७४९९९४९

## जाहीर प्रगटन

**दिवाणी न्यायालय क. स्तर लोहा ता. लोहा जि. नांदेड**
**मा. श्रीमती पी. व्ही. चिद्रे यांच्या न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६६/२०२६**
**कांताबाई वगैरे – विरुद्ध –निरंक**

अर्जदार :–
(१) कांताबाई परसराम भौंग वय ६० वर्षे धंदा घरकाम
(२) दत्ता परसराम भौंग वय ४५ वर्षे धंदा मजूरी
३) मोहन परशुराम भौंग वय ३९ वर्षे धंदा मजूरी
सर्व रा. कांजाळा पो. कापसी ता. लोहा जि. नांदेड
विरुद
गैरअर्जदार – निरंक

प्रकरण – कलम २ बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट अन्वये मयत परसराम शेषेराव भौंग यांचे अर्जदार हे वारस असल्याचे घोषीत करून वारसा प्रमाणपत्र देणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अ‍ॅड. के.डी. गायकवाड यांच्या मार्फत अर्ज केला आहे.

हे की, मयत नाम परसराम शेषेराव भौंग हे दिनांक २४/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी व अर्जदार क्र २ ते ३ हे मयताचे अपत्य आहेत. मयतास अर्जदाराशिवाय इतर कोणीही दुसरे कायदेशीर वारस नाहीत.

हे की, अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत तसेच अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे वारसाहक्क प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी अर्जदारानी अर्ज केला आहे.

तरी अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) देणे बाबत कोणास काही आक्षेप, उजर किंवा हरकत असेल तर ते त्यांनी दिनांक ३०/०९/२०२६ रोजी पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः किंवा वकीला मार्फत उपस्थित राहुन लेखी आक्षेप सादर करावा, अन्यथा पुढील आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक २४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, लोहा**

## जाहीर प्रगटन

**नादेड येथील ४ थे सह दिवाणी न्या. क. स्तर नांदेड**
**यांच्या न्यायालयात**
**समक्ष म.र. कायस्थ सह. दि. न्यायालय क. स्तर**
**किरकोळ अर्ज क्र.१२६६/२०२६**

१. रुखीया बेगम भ्र. सयद अन्वर
वय ५५ वर्ष धंदा घरकाम
रा घर न. ९-५-१३५८ पाकीजा नगर, इतवारा नांदेड
२. सयद मनूरवार पि. सयद अन्वर
वय २८ वर्ष धंदा लेबर
रा. अखील किराणा जवळ पाकीज नगर, देगलूर नाक, इतवारा नांदेड
३. सयद समीर पि सयद अन्वर
वय २५ वर्ष धंदा लेबर
रा. मजीद निमरा जवळ, पाकीजा नगर देगलूर नाका इतवारा नांदेड
४. फौजीया बेगम भ्र.सयद आशफाक
@ फौजीया बेगम पि. सयद अन्वर
वय २५ वर्ष धंदा घरकाम
रा. दुर्गा रोड, हाजी हमीद कॉलनी परभणी
विरुध्द – निल
दावा:– बॉम्बे रेगूलेशन ॲक्ट १८९२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअथी अर्जदार मयत सयद अन्वर सयद हसन याचे वारस आहेत मयत सयद अन्वर सयद हसन यांचा मृत्यू दिनांक ०९/१०/२०२३ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही अट असल्यास त्यांनी तो स्वतःता न्यायालयात २९/०९/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझ्या सहनशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वा/–
क. लिपीक
४ थे सह दिवाणी न्यायालय
क स्तर नांदेड

आदेशावरून
स. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर
नादेड

